PDF-XChange Viewer Click to buy NOW! www.docu-track.com


# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर
## (विद्युत)

निष्काम जन सेवार्थ समर्पित

फोन(०२४०) २३३३५३३६-४०, २३४८००१-०५ २३३१२८१, २३३१३१५


जा.क्र./मनपा/विद्युत/ 125 /२०२४ दिनांक ~~१२~~ 12 /०२/२०२४

### निविदा सुचना

आयुक्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हे खालील दर्शविण्यात आलेल्या कामाकरीता खालीलप्रमाणे E.O.I. मागविण्यात येत आहे. या E.O.I. फक्त महानगरपालिकेच्या नोंदणीकृत्त कंत्राटदारांना महानगरपालिकेच्या (www.mahatenders.gov.in) या वेबसाईट वरुन खरेदी करता येतील. E.O.I. च्या अटी व शर्ती वरील वेबसाईटवर नमुद असतील E.O.I. फक्त इंटरनेटवरुनच खरेदी करता येतील व ईटरनेटवरुनच भरता येतील.

आर्थिक विश्लेक्षण करण्यासाठीचा तपशिल नमुना सोबत जोडला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदेचा प्रकार | निविदा रक्कम | ठेकेदाराचा वर्ग | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात असलेल्या महानगरपालिकेच्या मोकळया जागेवर पी.पी.पी. तत्वावर विद्युत वाहन चार्जिंग उभारणी करणे बाबत. | E.O.I | PPP | अ | 6 महीने |

शहर अभियंता
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

Inward No 1303
Date 13/02/24
E - Tender Cell Aurangabad

PDF-XChange Viewer
Click to buy NOW!
www.docu-track.com

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

फोन: (२४०)-२३३३५३६-४०,२३४८००१-०५,२३३१२८१,२३३१३१५
फॅक्स:-(०२४०)-२३३१२१३

बेटी बचाओ
save the girl child

PDF-XChange Viewer
Click to buy NOW!
www.docu-track.com

जा.क्र./मनपा/विद्युत/ 57 /२०२४ दिनांक 12/ 02 /२०२४

शुध्दीपत्र

प्रति,

**ई-निविदा विभाग प्रमुख,**
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका.

**विषय :- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात असलेल्या महानगरपालिकेच्या मोकळया जागेवर पी.पी.पी. तत्वावर विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन उभारणी करणे व चालवणेसाठी प्रिबीड मिटींग बाबत.**
**संदर्भ :- जा.क्र./मनपा/विद्युत/ १२५/ २०२४ दिनांक १२.०२.२०२४**

वरील संदर्भिय विषयान्वये आपल्या कार्यालयास स्वारस्य अभिव्यक्तीची जाहीर सुचना छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात असलेल्या महानगरपालिकेच्या मोकळया जागेवर पी.पी.पी. तत्वावर विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन उभारणी करणे व चालवणेसाठी प्रसिध्दी करण्यासाठी देण्यात आलेली आहे.

परंतु त्यामध्ये प्रिबीड मिटींगची तारीख कळविण्यात आलेली नाही. तरी मा.शहर अभियंता यांचे बरोबर चर्चा करुन दिनांक २६.०२.२०२४ रोजी प्रिबीड मिटींग छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत होईल. प्रिबीड मिटींग बाबत प्रसिध्दीस सादर.

**कार्यकारी अभियंता,** (विद्युत)
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

प्रत..

**मा. शहर अभियंता,** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना माहितीस्तव सविनय सदर.

DY.LETTER 564

PDF-XChange Viewer
Click to buy NOW!
www.docu-track.com

PDF-XChange Viewer
Click to buy NOW!
www.docu-track.com

# BID EVALUATION

## Financial Evaluation :-

| Sr.No. | Scope to task | Service charge to be shared with CSMC INR /Unit, in number | Service charge to be shared with CSMC INR /Unit, in words |
|---|---|---|---|
| 1 | Providing, installing of slow and fast electric vehicle Charging Station at rented Municipal Corporation Land And supply of equipment to establish, operate and maintain public vehicle charging station for a duration of 20 years on revenue sharing basis (Including getting permits, providing human resource and other allied services) | | |

- The service charge shall be capped at Rs. 3 per unit as per the current prevailing rate and shall change as per the future cap set by the MSEDCL or relevant authority.

- The minimum service charge to be share with CSMC is 10%.

**City Engineer**
Municipal Corporation, Chha.sambhajinagar

PDF-XChange Viewer Click to buy NOW! www.docu-track.com


# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

फोन: (२४०)-२३३३५३६-४०,२३४८००१-०५,२३३१२८१,२३३१३१५
फॅक्स:-(०२४०)-२३३१२१३


बेटी बचाओ Save the girl child

जा.क्र./मनपा/विद्युत / 125 /२०२४ दिनांक 12 /02 /२०२४

## * स्वारस्य अभिव्यक्तीची जाहीर सुचना *

### छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात असलेल्या महानगरपालिकेच्या मोकळया जागेवर पी.पी.पी. तत्वावर विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन उभारणी करणे व चालवणेसाठी स्वारस्य प्रगटन (E.O.I)

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात असलेल्या महानगरपालिकेच्या मोकळया जागेवर तसेच शिक्षणसंस्था व राज्य शासकीय कार्यालयाच्या मोकळया जागेत त्यांनी जागा उपलब्ध करुन दिल्यास विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप (P.P.P) तत्वावर उभारणी करणे व चालविणेसाठी कंपनी, इच्छुक व्यक्ती व इतर यांचे कडुन स्वारस्य प्रस्ताव (E.O.I) मागविण्यात येत आहे.

त्यासाठी महानगरपालिकेच्या मोकळया जागेचा तपशिल सोबतच्या यादी प्रमाणे आहे.

महानगरपालिकेच्या मोकळया जागेवर ई.व्ही.चार्जिंग चे स्वारस्य प्रस्ताव (E.O.I) ऑनलाईन www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.9 / 2 /2024 ते दि.10/ 2/ 2024 या कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळता ऑनलाईन स्वारस्य प्रस्तावात भाग घेता येईल. दि. 10/ 3 /24 रोजी स्वारस्य प्रस्ताव (E.O.I) शक्य त्याच दिवशी किंवा कार्यालयाच्या सोयीनुसार तांत्रिक लिफाफे खुले करण्यात येईल. प्राप्त स्वारस्य प्रस्ताव (E.O.I) स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे, तसेच प्राप्त (E.O.I) नाकारण्याचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका यांनी राखीव ठेवले आहेत.

* **स्वारस्य प्रगटन E.O.I. बाबतच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे. :-**

1) विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन ही भविष्यात लागणारी व आवश्यक बाब आहे. ग्रीन एनर्जी वापर वाढवुन वातावरणा मधील प्रदुषण कमी करणेसाठी सदरचे काम करणे आवश्यक आहे. या करिता केंद्र शासन (N.C.A.P) National clean Air Program राबवीत आहे.

2) स्वारस्य धारकाने प्रस्तावासोबत स्थायी पत्याची साक्षांकित प्रत, पॅनकार्ड, आधारकार्डची प्रत दयावी. तसेच संस्था असल्यास संस्थेचे पॅनकार्ड व नोंदणी प्रमाणपत्राची प्रमाणित केलेली प्रत सादर करावी.

3) निविदा धारकांने वार्षिक उलाढाला बाबत मागील 03 वर्षाचा वार्षिक ताळेबंद सादर करावा.

4) स्वारस्य धारकास कामाची जागा व त्याच्या सभोवतालची पाहणी करुन परिक्षण करण्याचा सल्ला दिला जातो.या (E.O.I) मध्ये नमुद केलेल्या व्याप्तीनुसार बोली तयार करण्यासाठी आणि कामांसाठी करार करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती त्यांनी त्यांचे स्तरावरुन मिळवावी. साईटला भेट देण्याचा खर्च बोलीदाराच्या स्वत:च्या खर्चाने करावा. या प्रकल्पामध्ये ग्राहकाकडुन मिळालेल्या महसुला मध्ये महानगरपालिकेचा हिस्साचा समावेश असणार आहे. जे बोलीदार जास्तीत जास्त महानगरपालिकेचा हिस्सा देतील त्या आधारे स्वारस्य धारकाची निवड करण्यात येईल. त्यासाठी स्वारस्य

PDF-XChange Viewer
Click to buy NOW!
www.docu-track.com

धारकाने अथवा त्यांचे कडील अधिकृत / प्राधिकृत स्वाक्षरी काराने स्वाक्षरी करुन प्रस्ताव सादर केला पाहिजे.

5) यशस्वी कंत्राटदाराने इलेक्ट्रिक व्हेईकल चार्जिग स्टेशन त्याच्या खर्चाने उभारणी करावयाची आहे. तसेच त्याची संचलन व सुव्यवस्था स्वत: करावयाची आहे.

6) वरील निर्देशित ठिकाणी 20 वर्षा करीता (पुढील 05 वर्ष वाढ होऊ शकते.) जागा भाडे तत्वावर उपलब्ध करुन देण्यात येईल. या भाडे तत्वाची दरवर्षी वार्षिक भरणा आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला करावी लागेल.

7) या व्यतिरिक्त इतर ठिकाणांच्या स्थानाची यादी नंतर आपणास कराराच्या कालावधी मध्ये कळविण्यात येऊ शकते. तसेच वरील दर्शिवलेल्या स्थानामध्ये बदलही होऊ शकतो.

8) निवड झालेल्या स्वारस्य धारकाची निवड मुल्यांकन तांत्रिक प्रस्ताव व आर्थिक निकषावर मुल्याकंन करण्यात येईल.

9) निवडझालेल्या स्वारस्य धारकांस इलेक्ट्रिक व्हेईकल चार्जिग करण्यासाठी मिळणाऱ्या सर्विस चार्जेसच्या किमान 10% शेअर्स किंवा त्या पेक्षा अधिकचे महानगरपालिकेला दयावे लागेल.

10) जी.एस.टी. तसेच EPF / ESIC नोंदणी आवश्यक आहे.

11) उभारण्यात येणाऱ्या चार्जिग स्टेशनसाठी लागणाऱ्या सर्व साहित्याचा देखभाल व दुरुस्तीचा खर्च व करार कालावधीत असे पर्यंत व दोष दायित्व ची जबाबदारी निवड झालेल्या स्वारस्य धारकाची राहिल यासाठी कोणताही खर्च महानगरपालिकेकडुन दिला जाणार नाही.

12) निविदा धारकांकडे कार्यरत असलेले कामगार / मजूर यांचे EPF व ESIC संबंधीत आवश्यक सर्व कागदपत्र / प्रमाणपत्र स्कॅन करुन निविदा कागदपत्रांसोबत अपलोड करणे आवश्यक आहे.

13) म.रा.वि.वि.कंपनीकडुन मंजुरी व नवीन मीटरसाठीचा खर्च व मासिक विद्युत देयकाची अदाईगीची जबाबदारी कंत्राटदार यांची राहील.

14) या प्रकल्पासाठी मनपाच्या व इतर मोकळया जागांचे हस्तांतरणच्या दिनांका पासुन विद्युत वाहन चार्जिग स्टेशनचा पुरवठा आणि उभारणी आदेश दिल्यानंतर चार्जिग स्टेशन उभारणीचे काम सहा महिन्यात पूर्ण करणे बंधनकारक राहील.

15) विद्युत वाहन चार्जिग स्टेशनची मालकी वीस वर्ष किंवा मुदतवाढ दिल्यास जास्तीत जास्त 25 वर्षा पर्यंत एजन्सीची राहील. करार मुद्दत संपल्यानंतर मनपाला चार्जिग स्टेशन सर्व मिळकत सुस्थितीत मनपाला तपासुन विना मोबदला हस्तांतरीत करावी लागेल व ती मनपाची संपत्ती होईल. मालकी हक्क एजन्सी ने मनपाला हस्तांतरीत करण्यापूर्वी एजन्सीला सर्व देयके / कर्ज / देणी / भरणा करावे लागतील.

16) एजन्सी आवश्यक असलेले सर्व Levies आणि Taxes जे शासन व ईतर प्राधिकरणेला आता किंवा भविष्यात लागतील त्यासाठीचा सर्व शुल्काचा भरणा एजन्सीला स्वखर्चाने करावा लागेल.

17) एजन्सी नवीन शेड, बॅरिकेटींग व इतर सर्व बांधकामे, barricading, E.V. Charging station साठी आवश्यक असेल ते सर्व स्व:खर्चाने करेल, व त्यासाठी लागणारी आवश्यक ती परवानगी त्या प्राधीकरणाकडुन घेईल.

18) एजन्सी स्थळावर ग्राहकांच्या सुविधे करिता वापराकरिता शौचालय उभारणी करेल व त्यांचे संचलन व सुव्यसस्था करेल मात्र यासाठी मनपाकडुन पुर्व परवानगी घेणे आवश्यक असेल.

19) एजन्सीने महसुलात वाढ होण्यासाठी कॅफेटेरिया स्वर्खचाने उभारुन नागरीकांसाठी खुले करेल त्यासाठी व जाहिरात करणेसाठी नियमानूसार शुल्क भरणाकरुन मनपाकडुन परवानगी घेईल.

20) एजन्सी ग्राहकाकडुन चार्जेस घेऊन मनपाला ESCROW Account काढुन त्या द्वारे वेळीच / दररोज महसुलाची रक्कम हस्तांतरीत करील यासाठी सक्षम व्यवस्था / यंत्रणा स्व:खर्चाने उभारावी लागेल.

21) एजन्सी दर महिन्याला आवश्यक कागदपत्रे अदययावत अहवाल सादर करेल.

22) एजन्सी लागणारे मनुष्यबळ, साहित्य देखभाल व दुरुस्ती करेल. तसेच काही Accident झाल जबाबदारी एजन्सीची राहील.

23) एजन्सीला लागणाऱ्या सर्व परवानगी एजन्सी स्वखर्चाने व मनपाची आवश्यक असेल / लागु असेल त्या ठिकाणी पुर्व परवानगी प्राप्त करेल व त्याची कार्यवाही करुन मनपाला माहिती देईल.

24) एजन्सीला CCTV व सुरक्षेसाठी सर्व यंत्रणेची उभारणी करेल व त्या विषयीची Monitoring साठी मनपाला कनेक्टीव्हीटी स्वखर्चाने 24x7 स्वरुपात उपलब्ध करुन देईल.

25) एजन्सीचा कालावधी अटी आणि शर्तीनुसार वाढविणे अथवा कमी करणे या बाबत मनपाला सर्व अधिकार राहील.

26) एजन्सी Cloud based Technology चा आधुनिक तंत्रज्ञानचा उपयोग करुन Charging App द्वारे E.V.Charging station चे संचलन व सुव्यवस्था करेल. एजन्सीने E.V. Station वापरण्याचे बद्दल Presentation सादर करणे गरजेचे आहे.

27) E.V. Charging station ची तपासणी महानगरपालिकेचे प्रतिनिधी / पथक वेळोवेळी करेल तेव्हा सर्व अभिलेखे त्याना तपासणीसाठी उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

**जी. श्रीकांत** (भा.प्र.से)
**आयुक्त तथा प्रशासक**
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

Signature Not Verified
Digitally signed by Mohini Sunil Warbhuvan
Date: 2024.02.14 18:13:36 IST
Location: Maharashtra-MH